नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक **यश सिद्धि न्यूज**

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २६१ Issue - 261 | वार मंगळवार दि. १० फेब्रुवारी २०२६ Blow- Tuesday Date 10 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यातील जि.प., पं.स. वर महायुतीचा झेंडा



## भाजप नंबर १, अजितदादांची राष्ट्रवादी दुसऱ्या स्थानावर; महाविकास आघाडीचा सुपडासाफ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समि त्यांसाठी शनिवारी मतदान पार पडलं त्याचा निकाल काल हाती लागला. या निकालात सत्ताधारी महायुतीनं पुन्हा एकदा वर्चस्व गाजवलं. सर्वच्या सर्व १२ जिल्हा परिषदांम ध्ये महायुतीचा झेंडा फडकला. १२ पैकी ८ जिल्हा परिषदांमध्ये भाजप, तीन जिल्हा परिषदांमध्ये शिवसेना आणि पुणे जिल्ह्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीनं बाजी मारली. तर नगरपालिका आणि नगरपंचायत त्यापाठोपाठ महानगरपालिका आणि आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे निकालात विजयाची हॅटट्रिक साधत भाजपच नंबर वनचा पक्ष ठरला आहे. ग्राम ीण महाराष्ट्राचा कणा असलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतही भाजपनं पकड मिळवली असून विरोधकांच्या महाविकास आघाडीला मात्र या निवडणुकीत सपशेल पराभव स्वीकारावा लागला.

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समितीच्या पार पडलेल्या निवडणुकीत भाजपच क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे. तर राष्ट्रवादी अजित पवार गट दुसऱ्या स्थानी राहिला आहे. यापू- र्वी नगरपालिका आणि महापालिका निवडणुकीतही विक्रमी जागा जिंकत भाजपने यशाचे शिखर गाठले होते. जिल्हा परिषदेच्या ७३१ तर पंचायत समितीच्या १४६२ जागांसाठी ही निवडणूक पार पडली होती. जिल्हा परिषदेत ७३१ जागांपैकी भाजपचे सर्वाधिक २३३ सदस्य निवडून आले आहेत. त्याखालोखाल अजित पवार गट १६७ आणि शिंदेसेना १६२ जागा जिंकल्या आहेत. महायुतीने ७३१ पैकी तब्बल ५६२ जागा जिंकल्या आहेत. दुसरीकडे काँग्रेस ५६, शरद पवार गट २६ आणि उद्धवसेना ४३ अशा महाविकास आघाडीने अवघ्या १२५ जागा जिंकल्या आहेत. (Maharashtra 12 Zilla Parishad Result 2026)

१२ जिल्हा परिषद, १२ निकाल; कुठे-कुणाची सत्ता?

रायगड

जिल्हा परिषदेचा निकाल - एकूण जागा ५९

शिवसेना =२१, राष्ट्रवादी =१६, भाजप=१५, उबाठा शिवसेना =०५, कॉंग्रेस =०२

रत्नागिरी

जिल्हा परिषदेचा निकाल- एकूण जागा : ५६

भाजप- ०४, शिंदे शिवसेना - ४०, राष्ट्रवादी अजित पवार गट- ५, शिवसेना ठाकरे गट - ६, मनसे -१

सिंधुदुर्ग

जिल्हा परिषदेचा निकाल- एकूण जागा- ५०

भाजपा - २७ , शिंदे सेना - १४, उबाठा - ३, अपक्ष - ६

पुणे

जिल्हा परिषदेचा निकाल- एकूण जागा- ७३

भाजप -- १०, शिवसेना -- ५, राष्ट्रवादी -- ५१, शरद पवार गट --१, ठाकरे गट -- ६, कॉंग्रेस --०, अपक्ष -- ०

सातारा

जिल्हा परिषदेचा निकाल- एकूण जागा- ६५

भाजप - २७ , राष्ट्रवादी - २०,. शिवसेना - १५, कॉंग्रेस -१, इतर -२

सांगली

जिल्हा परिषदेचा निकाल- एकूण जागा- ६१

भाजपा - १६, राष्ट्रवादी अजित पवार - ०६, शिंदेसेना - ०७, कॉंग्रेस - ११, राष्ट्रवादी शरद पवार - १८, शिवसेना ठाकरे पक्ष - ०१, रयत क्रांती संघटना - ०१, जनस-ुराज्य शक्ती पक्ष - ०१

कोल्हापूर

जिल्हा परिषदेचा निकाल- एकूण-जागा ६८

भाजप - १२. शिवसेना (शिंदे) - ९, राष्ट्रवादी - २०, कॉंग्रेस - १४

शिवसेना (ठाकरे) - १, जनस-ुराज्य - ५, स्वाभिमानी शेतकरी संघटना - १, शाहू आघाडी राजेंद्र पाटील यड्रावकर गट - ४

सोलापूर

जिल्हा परिषदेचा निकाल- एकूण जागा- ६८

भाजपा - ३८, राष्ट्रवादी अजित पवार - ११, राष्ट्रवादी शरद पवार - ५, शिवसेना (शिंदे गट) - ८, शेकाप - ३, करमाळा स्थानिक आघाडी - २, तीर्थक्षेत्र विकास आघाडी १

छत्रपती संभाजीनगर

जिल्हा परिषदेचा निकाल- एकूण जागा- ६३

भाजप : २३, शिवसेना : २१, शिवसेना UBT: ९, NCP : ४, NCP SP ; १, कॉंग्रेस : १, वंचित : ००, MIM: ०, अपक्ष : ४ ( २ भाजप समर्थक, १ शिंदे समर्थक, १ प्रहार )

परभणी

जिल्हा परिषदेचा निकाल- एकूण जागा- ५४

भाजप : २४, Ncp:- १५, शिवसेना : ०५, शिवसेना UBT: ०६, कॉंग्रेस : ०३, वंचित : ००, MIM: ००, अपक्ष :०१

धाराशिव

जिल्हा परिषदेचा निकाल- एकूण जागा- ५५

भाजप - १९, शिवसेना (शिंदे गट) - १५, ठाकरे गट (शिवसेना उ.बा.ठा.) - ७, राष्ट्रवादी कॉंग्रेस (NCP) -६, कॉंग्रेस- ३, अपक्ष - ३, अपक्ष (भाजप पुरस्कृत) - १, समाजवादी पक्ष - १

लातूर जिल्हा परिषदेचा निकाल- एकूण जागा- ५९

भाजप : १८, कॉंग्रेस : २३, शिवसेना : ०१, शिवसेना UBT: ०१, छउझ अजित पवार : ११, छउझ शरद पवार : ०१, वंचित : ००, मनसे : ०१, अपक्ष : ०२

# राज्यात ७० हजार पदांसाठी नोकरभरती होणार : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात लवकरच सुमारे ७० हजार पदांची मोठी नोकरभरती प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ही भरती नव्या, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने करण्यात येणार असून तरुणांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे. या भरतीम ध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत

### एपीएससीकडून २० हजार पदांची भरती

घेण्यात येणाऱ्या सुमारे २० हजार पदांचा समावेश असेल, तर उर्वरित पदे आयोगाबाहेरील विविध विभागांम ध्ये भरली जाणार आहेत.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सेवा प्रवेश नियमावली सुधारणा संदर्भात उच्चस्तरीय बैठक पार पडली. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि संबंधित विभागांचे सचिव उपस्थित होते.




भरती प्रक्रियेत आवश्यक कौशल्ये, पात्रता निकष आणि काम ाच्या स्वरूपानुसार निर्णय घेतले जा- तील, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. सेवा प्रवेश नियमावलीतील बदलांचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत मांडला जाणार आहे.

भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाइन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि डिजिलॉकर प्रणालीचा वापर करून प्रमाणपत्र पडताळणी सुलभ करण्यात येईल. पासपोर्टसारख्या संवेदनशील दस्तऐवजांची ऑनलाइन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे मॉडेल वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या.

राज्य प्रशासनात कार्यक्षमतेला गती - राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये ७० हजार पदे भरल्यानंतर प्रशासनाच्या कार्यक्षमतेत मोठी वाढ होईल. भरती प्रक्रियेत कोणताही पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रणाली पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले. तरुणांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी स्वच्छ, वेगवान आणि तंत्रज्ञानाधारित भरती प्रणाली उभारण्यावर शासनाचा भर असेल.

महाराष्ट्राचे मॉडेल देशासाठी म ार्गदर्शक

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र म ोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत महाराष्ट्र शास- नाचे मनुष्यबळ व्यवस्थापन मॉडेल सर्वाधिक प्रशंसनीय ठरले. इतर राज्यांनीही हे मॉडेल स्वीकारावे, असे निर्देश पंतप्रधानांनी दिल्याचे त्यांनी नमूद केले. येणाऱ्या एका वर्षात म हाराष्ट्रात गव्हर्नन्स रिफॉर्मचे नवे मॉडेल उभे राहील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

# ८ लाखांची लाच घेताना उपअभियंता रंगेहात अटक; ठेकेदाराचे बिल पास करण्यासाठी मागितले पैसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धुळे : विद्युत ठेकेदाराकडून बिलाच्या मोबदल्यात ८.५० लाख रुपयांची लाच मागून तडजोडीअंती ८ लाख रुपये स्वीकारने उपअभियंत्याला चांगलंच महागात पडलं. नंदुरबार सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) विद्युत उपविभागाचा उपअभियंता नितीन इंगळे याला धुळे लाचलुच- पत प्रतिबंधक विभागाने (उइ) लाच स्वीकारताना रंगेहात अटक केली. ही कारवाई धुळ्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात सोमवारी सायंकाळी करण्यात आली. या घटनेमुळे विभागात एकच खळबळ उडाली आहे.



तक्रारदार हा शासकीय नोंदणीकृत विद्युत ठेकेदार असून त्याने शासनाच्या विविध विद्युत कामांचे ठेके घेत- ले होते. संबंधित प्रकरणात बिल अदा करण्याच्या बदल्यात लाच मागितल्याची तक्रार उइकडे करण्यात आली होती.

सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे अंतर्गत नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील २८ गावांमध्ये आणि पाड्यांमध्ये डएऊ सोलर स्ट्रीट लाईट बसविण्याचे काम तक्रारदारांच्या फर्मला मंजूर झाले होते. जीएसटी वगळता २ कोटी ३७ लाख २९ हजार ३५६ रुपयांची निविदा मंजूर होऊन कामाची वर्क ऑर्डर देण्यात आली होती. संबंधित कामे मुदतीत पूर्ण करण्यात आली.

मार्च २०२५ मध्ये ४१ लाख रुपयांचे बिल अदा करण्यात आले होते. त्या वेळी उपअभियंता नितीन इंगळे याने ८० हजार रुपये स्वीकारून उर्वरित रक्कम पुढील बिलावेळी देण्याची मागणी केल्याचा आरोप आहे.

डिसेंबर २०२५ मध्ये उर्वरित कामाचे २ कोटी २ लाख ५ हजार ५२५ रुपये तक्रारदारांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले. त्यानंतर उपअभियंत्याने बिल अदा केल्याच्या मोबदल्यात ८ लाख ५० हजार रुपयांची लाच मागितली. पैसे दिल्याशिवाय पुढील कामांच्या बिलांवर सह्या करणार नसल्याचेही सांगितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर उइने सापळा रचला. तडजोडीअंती उपअभियंत्याने ८ लाख रुपये स्वीकारण्याचं मान्य केलं.

सोमवार, ९ फ्रेब्रुवारी रोजी सायंकाळी धुळ्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात नितीन इंगळे याला तक्रारदारांकडून ८ लाख रुपये स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. त्यानंतर त्याला तात्काळ अटक करण्यात आली. या कारवाईमुळे सार्वजनिक बांधकाम विभागात मोठी खळबळ उडाली असून लाचखोरीविरोधातील कारवाई अधिक तीव्र होण्याचे संकेत मिळत आहेत.



## संपादकीय....

### भाजपाचे वर्चस्व

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी शनिवारी मतदान पार पडलं त्याचा निकाल काल हाती लागला. या निकालात सत्ताधारी महायुतीनं पुन्हा एकदा वर्चस्व गाजवलं. सर्वच्या सर्व १२ जिल्हा परिषदांमध्ये महायुतीचा झेंडा फडकला. १२ पैकी ८ जिल्हा परिषदांमध्ये भाजप, तीन जिल्हा परिषदांमध्ये शिवसेना आणि पुणे जिल्ह्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीनं बाजी मारली. तर नगरपालिका आणि नगरपंचायत त्यापाठोपाठ महानगरपालिका आणि आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे निकालात विजयाची हॅटट्रिक साधत भाजपच नंबर वनचा पक्ष ठरला आहे. ग्रामीण महाराष्ट्राचा कणा असलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतही भाजपनं पकड मिळवली असून विरोधकांच्या महाविकास आघाडीला मात्र या निवडणुकीत सपशेल पराभव स्वीकारावा लागला. राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समितीच्या पार पडलेल्या निवडणुकीत भाजपच क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे. तर राष्ट्रवादी अजित पवार गट दुसऱ्या स्थानी राहिला आहे. यापूर्वी नगरपालिका आणि महापालिका निवडणुकीतही विक्रमी जागा जिंकत भाजपने यशाचे शिखर गाठले होते. जिल्हा परिषदेच्या ७३१ तर पंचायत समितीच्या १४६२ जागांसाठी ही निवडणूक पार पडली होती. जिल्हा परिषदेत ७३१ जागांपैकी भाजपचे सर्वाधिक २३३ सदस्य निवडून आले आहेत. त्याखालोखाल अजित पवार गट १६७ आणि शिंदेसेना १६२ जागा जिंकल्या आहेत. महायुतीने ७३१ पैकी तब्बल ५६२ जागा जिंकल्या आहेत. दुसरीकडे कॉंग्रेस ५६, शरद पवार गट २६ आणि उद्धवसेना ४३ अशा महाविकास आघाडीने अवघ्या १२५ जागा जिंकल्या आहेत. या विजयामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची जोडी सध्या राज्याच्या राजकारणातील 'जोडी नंबर वन' म्हणून अधिक ठळकपणे समोर आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सलग तिसऱ्यांदा सर्वाधिक जागा मिळवत अनोखी हॅटट्रिक साधली आहे. नोव्हेंबर महिन्यात झालेल्या नगर परिषद निवडणुका, त्यानंतर जानेवारीत पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुका आणि आता फेब्रुवारीतील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका, या तिन्ही टप्प्यांमध्ये भाजपाने आघाडी घेतली. या यशामागे अचूक निवडणूक नियोजन, प्रभावी प्रचारयंत्रणा, स्थानिक आणि राज्य पातळीवरील समन्वय तसेच कार्यकर्त्यांशी थेट संवाद या घटकांचा मोठा वाटा आहे.

# गुरु तेगबहादूर सिंग : धर्म, मानवी अधिकार रक्षण करणारे विरक्त आद्यत्मवीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१. प्रस्तावना

भारतीय संस्कृतीमध्ये देश आणि धर्मासाठी आणि अखंड मानव कल्याणासाठी व मानवी हक्क आणि सुरक्षेच्या रक्षणाकरिता स्वतःच्या प्राणाची ही परवा न करता आत्मबलिदान देणारे व आपल्या कर्तृत्वातून शिकवण व तत्त्वज्ञानातून समाजापुढे एक वेगळा आदर्श निर्माण करणारे अनेक महापुरुष जन्मास आले. भारतीय संस्कृती ही जगभरामध्ये सौदार्यपूर्ण व्यवहार करणारी आणि सर्वसमावेशकतेचा आदर्श ठेवणारे विश्वबंधुत्वाची जननी आहे.

भारताच्या मध्ययुगीन इतिहासामधील सत्ता आणि धर्म संघर्ष यातून निर्माण झालेली प्रादेशिक अस्मिता, राजवटी उदयास आल्या यातून भारतीय संस्कृतीचा समन्वयवादी दृष्टिकोन विकसित होत गेला.

मध्ययुगात भक्ती चळवळीचा प्रचार व प्रसार होत होता. उत्तर भारतामध्ये धर्माचा जीवनवादी दृष्टिकोन, निर्गुण एकेश्वरवादी विचार ,मानवता ,विवेकवाद,गुरुग्रंथसाहेब शिकवणुकीस प्रमाण मानून त्यातील उपदेशाचे गेय पद्धतीने सिमरन (स्मरण)करत धर्म आणि मानवाचे रक्षणासाठी कार्य करणारा एक विचार आचार प्रवाह म्हणजे गुरू नानक देव यांनी स्थापन केलेला शीख धर्म होय .

शीख धर्मास दहा गुरूंची उत्तुंग अशी परंपरा लाभलेली आहे. अध्यात्मिक जागृती ,नैतिक मानवी मूल्यांची जपणूक करत, ईश्वराचे निराकार स्वरूप साक्षी मानून शीख धर्मच्या गुरूंनी अविरत कार्य केले.तत्कालीन कालखंडातील मुघल सम्राटांनी या मानवतावादी शिकवणी मुळे प्रसारित होणाऱ्या शीख धर्माच्या गुरूंना प्रतिरोध केला. यासाठी त्यांनी गुरुंन बरोबरच सामान्य जनतेवर देखील अनन्वित अत्याचार ,अन्याय केला. शास्त्राचा उपयोग करून कट्टरवादी विचार अधिक घट्ट करण्याचा हेका ठेवला. यास प्रत्युत्तर म्हणून पाचवे गुरु अर्जुनदेवसिंग यांनी आध्यत्मिकते बरोबर जनरक्षण आणि धर्म रक्षणावर भर दिला.त्या नंतर सहावे गुरू हरगोविदसिंग यांनी पिरी आणि मिरी या संकल्पनेतून धर्मरक्षक तलवार ही संकल्पना जनमानसात रुजवली. आद्यात्मिक रक्षणासाठी पिरी तलवार जणरक्षण करण्यासाठी मिरी' तलवार ही संकल्पना रुजवली.

याच गुरू परंपरेतील एक तेजस्वी गुरु तेगबहादूर सिंग (१६२१-१६७५) हे अशाच महान व्यक्तिम त्त्वांपैकी एक आहेत. धार्मिक स्वातंत्र्य, मानवी अधिकार आणि नैतिक मूल्यांच्या रक्षणासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. म्हणूनच इतिहासात त्यांना हिंद दी चादर – म्हणजे हिंदू धर्माचे संरक्षण करणारे महान बलिदानी – असे गौरवले जाते. त्यांचे जीवन, तत्त्वज्ञान आणि साहित्यिक योगदान हे मध्ययुगीन भारतातील सामाजिक-धार्मिक संघर्षाचे जिवंत साक्ष्य आहे.

२. गुरु तेगबहादूर सिंग यांचे पूर्वायुष्य:

गुरु तेगबहादूर सिंग यांचा जन्म १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे झाला. ते सहावे शीख गुरु गुरु हरगोबिंद सिंग यांचे कनिष्ठ पुत्र होते. बालपणापासूनच त्यांचा स्वभाव शांत, अंतर्मुख आणि वैराग्यशील होता. युद्धकौशल्य, शस्त्रविद्या यांचे प्रशिक्षण त्यांनी घेतले असले तरी त्यांचा कल आध्यात्मिक साधनेकडे अधिक होता. त्यांनी दीर्घ काळ ध्यान, तपस्या आणि आत्मचिंतनात घालवला.गुरु तेगबहादूर सिंग यांची वृत्ती ही विरक्त ,आद्यत्मिक , वीर वृत्तीची होती.

३. गुरु तेगबहादूर सिंग यांचे धार्मिक शिकवण आणि तत्त्वज्ञान व साहित्य :

त्यांची शिकवण ही निर्गुण भक्ती परंपरेशी निगडित आहे. संसार नश्वर आहे, ईश्वर निराकार आहे, अहंकार, लोभ व मोह हे बंधनाचे मूळ आहेत, नामस्मरणातून मुक्ती प्राप्त होते हे त्यांचे मूळतत्व आहे. त्यांच्या साहित्यामधील ११५ शबद श्री गुरु ग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट आहेत. ही रचना विविध रागांमध्ये असून त्यामध्ये वैराग्य, आत्मज्ञान आणि जीवनाची क्षणभंगुरता प्रकर्षाने आढळते.

गुरुबानी उदाहरण :

(शरीर, धन आणि कुटुंब – सर्व मिथ्या आहेत.)

त्यांची भाषा साधी, पण अर्थगर्भ आहे. अलंकारांपेक्षा तत्त्वज्ञानात्मक आशय त्यांच्या काव्याताप्रधान आहे.

४. औरंगजेब व मुघल सत्तेशी संघर्ष:

मुघल सम्राट औरंगजेब याची धार्मिक नीति कट्टर इस्लामी होती. त्याच्या कारकिर्दीत मंदिरध्वंस, जिझिया कर आणि जबरदस्तीचे धर्मांतर वाढले.

औरंगजेबाच्या काळात हिंदूंवर, विशेषतः काश्मिरी पंडितांवर जबरदस्तीने धर्मांतर लादले जात होते.काश्मिरी पंडितांनी आपले धार्मिक स्वातंत्र्य वाचवण्यासाठी गुरु तेगबहादूर सिंग यांच्याकडे धाव घेतली. त्यांनी धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी पुढाकार घेतला.

त्या वेळी त्यांनी औरंगजेबास स्पष्ट संदेश दिला की, जर मला इस्लाम स्वीकारायला भाग पाडले, तरच इतरांनी धर्मांतर करावे. औरंगजेबाला मात्र शेवटपर्यंत गुरू तेगबहादूर यांचे धर्मांतर करून त्यांना इस्लाम मध्ये परावर्तित करणे शक्य झाले नाही.

औरंगजेबाने त्यांच्या या भूमिकेस अत्यंत द्वेषाने व कट्टरतेने उत्तर दिले व त्यांच्या दोन सहकाऱ्यांबरोबरच गुरू तेगबहादूर यांची ११ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीतील चांदणी चौकात अनन्वित अत्याचार करून क्रूर हत्या करण्यात आली.

गुरु तेगबहादूर सिंग यांचे हे बलिदान मानवी अधिकार व धार्मिक स्वतंत्र्य रक्षणासाठीचे प्रतीक आहे. त्यांचे हे बलिदान केवळ हिंदू धर्मासाठी नव्हते, तर सर्व धर्मांच्या स्वातंत्र्यासाठी होते. म्हणूनच त्यांचे बलिदान हे धर्मरक्षण या संकुचित अर्थापलीकडे जाऊन मानवी अधिकारांचे रक्षण ठरते यातून व्यापक अशी असलेली .हिंद दी चादर उपाधी आणि संकल्पना समाजात रुढ झाली.

५. धर्मरक्षण व मानवी अधिकारांचे संरक्षण

गुरु तेगबहादूर सिंग यांचे बलिदानाने हिंद दी चादर ही संकल्पना हे इतिहासातील मानवी अधिकारांसाठी दिलेले पहिले संघटित बलिदान मानले जाते. त्यांनी धर्म म्हणजे केवळ पूजा-पद्धती नव्हे, तर स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि विवेक असल्याचे प्रतिपादन केले. त्यांचा विचार आधुनिक ठळसहीं ीं ॠीशशवो ेष ठश-श्रळसळेप या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

६. समकालीन प्रस्तुतता

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात धार्मिक असहिष्णुता, मुलतत्ववाद आणि मानवी अधिकारांचे उल्लंघन वाढताना दिसते. अशा वेळी गुरु तेगबहादूर सिंग यांचे विचार अधिकच समकालीन ठरतात. त्यांचे जीवन हे धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता आणि नैतिक धैर्य यांचे आदर्श उदाहरण आहे. त्यांच्या प्रेरणेतू त्यांचे पुत्र गुरु गोबिंद सिंग यांनी खालसा पंथाची स्थापना केली. आजही शीख समाजात त्यांचे बलिदान न्याय व सत्यासाठी उभे राहण्याची प्रेरणा देते.

गुरु तेगबहादूर सिंग हे केवळ शीख धर्माचे गुरु नव्हते, तर मानवतेचे महान रक्षक होते. हिंद दी चादर म्हणून त्यांचे बलिदान आजही धार्मिक स्वातंत्र्य, मानवी अधिकार आणि नैतिक मूल्यांचे सर्वोच्च प्रतीक आहे. त्यांचे तत्त्वज्ञान आणि साहित्यिक योगदान हे भारतीय संतपरंपरेतील अमूल्य वारसा असून, समकालीन समाजासाठी ते सदैव प्रेरणादायी राहील.

लेखक:-

डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर (विभाग प्रमुख, प्राचीन भारतीय इतिहास,संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर

मोबाईल क्रमांक: ९९२२५२०९८५

Email ID: prabhakarkolekar@gmail.com

# शिवनेरी, शिवशाहीनंतर लालपरीच्या ताफ्यात आता 'राजमाता जिजाऊ' बस! परिवहन मंत्र्यांची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या ताफ्यात लवकरच नव्या बस दाखल होणार आहेत. गर्दीच्या मार्गावर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ३ बाय २ आसन रचनेच्या तब्बल ५५ आसनी अत्याधुनिक बस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बसला राजमाता जिजाऊ यांचे नाव देण्यात आले असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्या स्वराज्य संकल्पनेमागे उभी राहिलेली प्रेरणाशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ साहेब आहेत. या अर्थाने त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी ठरतात. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ एसटीच्या नवीन बसचे राजमाता जिजाऊ असे नामकरण केले आहे. अर्थात, एसटीने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा नावांनी बसगाड्यांना गौरवले आहे. आता त्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सध्याच्या बसची आसन क्षमता साधारण ४० प्रवासी इतकी असताना, नव्या बसमध्ये ५५ प्रवासी आरामात बसू शकतील. म्हणजेच गर्दीच्या मार्गावर उभे राहणाऱ्या तब्बल १५ प्रवाशांना आता बसण्याची सोय उपलब्ध होईल. त्यामुळे ही सेवा विशेषत: दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गावर सुरू करण्याचा एसटीचा मानस आहे, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

या नवीन बस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बस महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि अभिमानाचे चालते-बोलते प्रतीक ठरतील, असा विश्वास एसटी महामंडळाने व्यक्त केला. राजमाता जिजाऊ हे नाव केवळ नामकरण नाही, तर स्वराज्याच्या संस्कारांचा, मातृशक्तीच्या प्रेरणेचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठीच्या बांधिलकीचे एक सन्मानचिन्ह आहे. लवकरच इतिहासाच्या साक्षीने सजलेल्या या बस आधुनिक सुविधांसह महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावतील, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# आयआयटी कानपूर येथील स्टार्टअप स्पर्धेत स्वेरीला विजेतेपद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'बिल्डिंग भारत संपर्क-इनोव्हेशन बूट कॅम्प इन सिव्हील इंजिनिअरिंग' या उपक्रमाअंतर्गत कानपूर (उत्तर प्रदेश) च्या आयआयटी या संस्थेत आयोजिलेल्या या स्पर्धेत स्वेरीच्या 'शिलेदार्स' या संघामधील विद्यार्थ्यांनी विजेतेपद पटकावले आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



कानपूर मधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अर्थात आयआयटी या संस्थेत दि.०३ ते दि. ०५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान या स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या ६ विद्यार्थ्यांच्या टीमने प्रथम क्रमांक पटकावला आहे. ही एक थीम आधारित स्पर्धा होती. या स्पर्धेमध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील राहुल मारुती कवडे व सायली सिद्धनाथ कोरे, सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील ओंकार रणजीत मोरे व आदिती आबासाहेब चव्हाण तर कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील सुशांत धर्मेंद्र शेटे व ऋतुजा रामेश्वर राजमाने अशा तीन विभागांतील सहा स्पर्धक यामध्ये विजेते ठरले आहेत. विशेष म्हणजे या स्पर्धेसाठी वेगवेगळ्या पाच थीम होत्या. या स्पर्धेत भारतातून एकूण ६५ संघ सहभागी झाले होते. त्यापैकी सोलापूर जिल्ह्यातील स्वेरीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता विशेष लक्षवेधी ठरली. 'इनोव्हेशन इन एसेट मॅनेजमेंट' या थीम साठी स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पाच्या माध्यमातून 'वाहतुकीत प्रचंड गर्दी असताना त्यामध्ये रुग्णवाहिका अडकल्यास त्याला मार्ग मोकळा करण्यासाठी 'गोल्डन मिनिट' नामक विशेष प्रकल्प सादर केला होता. त्यामुळे स्वेरीचा 'शिलेदार्स' हा संघ विजेता ठरला. सहाही विजेत्या 'शिलेदार्स'ना एकत्रितरित्या रोख पाच हजार रुपये व प्रत्येकाला स्वतंत्र प्रमाणपत्र देवून बूट कॅम्पचे समन्वयक सुधीर मिश्रा यांच्या हस्ते व संचालक रजनिश दास गुप्ता यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले. निश्चित कालावधीत वास्तविक समस्येसाठी नाविन्यपूर्ण व्यवहार व विस्तार सक्षम उपाय विकसित करणे हा या स्पर्धेमागील उद्देश होता. आपल्या मर्यादा क्षमतेच्या बाहेर जावून विचार करण्याची क्षमता विकसित करणे, आधुनिक तंत्रज्ञान व अनुभव यांचा प्रभावी वापर करून उपक्रमांची मानसिकता विकसित करणे हा यामागील हेतू होता. यशस्वी विद्यार्थ्यांना तिन्ही विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष अशोक भोसले,उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम. एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांचे प्राचार्य, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, मार्गदर्शक डॉ. माणिक देशमुख, संशोधन अधिष्ठाता, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## १८ हजार रोजगार निर्मिती : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# दावोस कराराद्वारे अहिल्यानगरमध्ये १२ हजार कोटींची गुंतवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : दावोस कराराच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली असून, यात एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात ११ हजार ५१९ कोटी रुपयांची गुंतवणूक येणार आहे. याद्वारे १८ हजार रोजगाराची निर्मिती होणार असून उत्तर महाराष्ट्रामध्ये जवळपास ७५ हजार लोकांना रोजगार मिळेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

सुपा (ता. पारनेर) एमआयडीसी येथे 'तौरल इंडिया'च्या अत्याधुनिक उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार भागवत कराड, आमदार काशिनाथ दाते, सुरेश धस, विक्रमसिंह पाचपुते, तौरल इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक भरत गीते व थोनी ?ल्युमिनियमचे लोथर थोनी आदी उपस्थित होते.

इतक्या मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात गुंतवणूक येत असल्याचे नमूद करीत, मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, तौरल इंडियाचा हा प्रकल्प महाराष्ट्राच्या औद्योगिक आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. स्वतंत्र व आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी 'मेक इन इंडिया' संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. ज्या वस्तूंची आपल्याला आयात करावी लागते, त्याला सक्षम पर्याय देशातच निर्माण करणे ही काळाची गरज आहे. परदेशातून आयात कराव्या लागणाऱ्या गोष्टी आता भारतात व विशेषत: महाराष्ट्रात भरत गीते यांच्यासारख्या उद्योजकांमुळे तयार होत आहेत, ही अभिमानाची बाब आहे.

राज्याच्या औद्योगिक प्रगतीचा समतोल राखण्यावर शासनाचा भर आहे. पूर्वी राज्याची औद्योगिक प्रगती केवळ मुंबई, एमएमआर व पुणे या भागांपुरती मर्यादित होती. ती विकेंद्रित करून राज्याच्या सर्व भागांत पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सुपा एमआयडीसी हे त्याचेच एक उत्तम उदाहरण आहे. केवळ सामंजस्य करार करून न थांबता, ते प्रत्यक्षात आणण्यासाठी उद्योग विभाग तत्परतेने काम करत आहे. दावोसमध्ये २०२५ मध्ये करण्यात आलेला करार अत्यंत वेगाने प्रत्यक्षात आला आहेत, असेही श्री. फडणवीस यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले, देशाच्या अर्थव्यवस्थेने ११ व्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर झेप घेतली असून लवकरच आपण तिसऱ्या क्रमांकावर पोहोचू. भारताच्या ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या प्रवासात तंत्रज्ञान व उत्पादन क्षेत्राचा वाटा मोलाचा ठरणार आहे. या प्रवासात महाराष्ट्र भक्कम पाऊले टाकत आहे. दावोस दौऱ्यात १६ लाख कोटींचे करार करण्यात आले असून, त्यातील ७५ टक्के करार हे अंमलबजावणीच्या मार्गावर आहेत.

केवळ उद्योग उभारणे पुरेसे नाही, तर ते पर्यावरणपूरक असणे आवश्यक आहे. या प्रकल्पात 'सस्टेनेबल कास्टिंग' व 'रिसायकलिंग'वर भर देण्यात आला असून, राज्यात 'उद्योग व पर्यावरण' हातात हात घालून पुढे जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



उद्योजकांनी राज्याचे दूत म्हणून काम करावे, असे आवाहन करत श्री. फडणवीस यांनी उद्योगांना सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. ते म्हणाले, उद्योगांसाठी वीज दर पुढील पाच वर्षे स्थिर राहतील किंवा कमी होतील, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच, औद्योगिक वसाहतींमध्ये गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही. उद्योजकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्तींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मराठी उद्योजकाचे यश अभिमानास्पद – उद्योगमंत्री उदय सामंत

उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले , दावोसमध्ये झालेले करार केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरले आहेत, हे राज्यासाठी भूषणावह आहे. एका मराठी उद्योजकाने परदेशी भागीदारांच्या सहकार्याने ५०० कोटींची उलाढाल करणारा उद्योग उभा करणे हे नवउद्योजकांसाठी प्रेरणादायी आहे. हेलिकॉप्टर, जहाजे आणि रस्ते बांधणीसाठी लागणारे अद्ययावत भाग आता अहिल्यानगरमध्ये तयार होत आहेत, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

लोथर थोनी यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात श्री.गीते यांनी तौरल इंडिया प्रकल्पाबाबत माहिती दिली.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, भगवान गडाचे महंत ह.भ.प. नामदेव शास्त्री, नारायण गडाचे ह.भ.प शिवाजी महाराज यांच्यासह अनेक मान्यवर, उद्योजक व नागरिक उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर तालुक्यांमध्ये भोसे, रोपळे, वाखरी, कासेगाव, भाळवणी गटात राष्ट्रवादीचे वर्चस्व

## आमदार अभिजित पाटील यांनी दिला प्रस्थापितांना धक्का

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :शनिवारी जिल्हा परिषद पंचायत समितीचे मतदान घेण्यात आले होते. या मतांची मोजणी आज सोमवारी शासकीय गोदाम येथे करण्यात येत आहे. या निवडणुकीमध्ये, भोसे, रोपळे, वाखरी, भाळवणी, कासेगाव, या गटामध्ये माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांचे वर्चस्व होते. मात्र यंदाच्या निवडणुकीत आमदार अभिजीत पाटील यांचे राष्ट्रवादी काँग्रेसचे विजयी उमेदवार झाले आहेत.

आमदार अभिजीत पाटील यांनी प्रस्थापित नेत्यांना धक्का दिल्याचे दिसून येत आहे. यामुळे आगामी काळात पंढरपूर तालुक्याची समीकरणे बदलणार असल्याचे दिसून येत आहे. भाजपकडे मातेपर्यंत असताना अनुभवाचे प्रशांतराव परिचारक, कल्याणराव काळे, गणेश पाटील यांनी प्रचार करूनही यांना पराभव पत्करावा लागला.



२०१६ रोजी झालेल्या पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये माजी आमदार प्रशांतराव प्रचार यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडीचे वतीने लढवण्यात आली होती. या निवडणुकीमध्ये प्रचार गटाला चांगली यश मिळाले होते. मात्र यंदाच्या निवडणूक मध्ये भाजपने लक्ष केंद्रित केले होते.

भाजपच्या कमळ चिन्हावर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लढवण्यात आली तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अभिजीत पाटील यांनी यंदाच्या निवडणुकीकडे लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येत आहे. निवडणुकीच्या अगोदर विठ्ठल पर्वातील नेते. कल्याण काळे, युवराज पाटील, समाधान काळे, गणेश पाटील, यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपची ताकद वाढली अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली होती, मतदारांनी त्यांची जागा त्यांना दाखवून दिली. असल्याचे दिसून येत आहे. भोसे, पेहे, रुपया गटामध्ये राष्ट्रवादीचे उमेदवार विजयी झाले आहे. तर भाजपच्या उमेदवाराला पराभव पत्करावा असल्याची दिसून येत आहे. या निवडणुकीमध्ये माजी आमदार प्रशांतराव परिचारक, कल्याण काळे , युवराज पाटील, समाधान काळे, गणेश पाटील, यांना या निवडणुकीमध्ये धक्का बसलेली दिसून येत आहे.

# अजिंक्य तारा सोसायटी येथील सीवर लाईनच्या कामात मनपा एन विभागाच्या परिरक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून कंत्राटदाराची पाठराखण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/प्रतिनिधी ; प्रभाग क्रमांक १२७ मधील अजिंक्य तारा सोसायटी येथील सीवर लाईनचे काम हे संबंधित कंत्राटदाराकडून निष्कृष्ट दर्जाचे काम होत असल्याबाबत व संबंधित काम हे वर्क ऑर्डर प्रमाणे विहित कालावधीत सीवर लाईनच्या कंत्राटदाराने पूर्ण न केल्याने कामात कुचराई करणाऱ्या अशा कंत्राटदारावर मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त यांनी कारवाई करावी असे याबाबतचे लेखी तक्रार पत्र व त्याबाबतचे पुरावे देखील सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी सहाय्यक आयुक्त एन विभाग यांना दिले होते.

तसेच सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ही संबंधित सीवर लाईनच्या कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी केली होती. परंतु संबंधित मनपा एन विभाग परिरक्षण विभागाचे सहाय्यक अभियंता आणि त्यांचे अधिकारी यांनी कंत्राटदाराचीच याठिकाणी पाठराखण करून कंत्राटदाराने विहित कालावधीत काम पूर्ण न केल्याने कंत्राटदारावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही.तसेच सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त यांच्याकडे करण्यात आलेली लेखी तक्रार व परिरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर हे माझी दिशाभूल करणारे असून परिरक्षण विभागाचे सहाय्यक अभियंता हे संबंधित सीवर लाईनच्या कंत्राटदाराला याठिकाणी पाठीशी घालून त्याला वाचवत असल्याचे याठिकाणी स्पष्ट दिसत आहे. असे सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांचे म्हणणे आहे, तरी सामाजिक कार्यकर्ते केतन भोज हे याबाबत उप आयुक्त परि -०६ यांच्याकडे या संबंधित सर्व प्रकरणाबाबत भेट घेऊन मनपा एन विभाग परिरक्षण विभागाचे सहाय्यक अभियंता यांच्या अशा भोंगळ कारभाराबाबत व सीवर लाईनच्या कंत्राटदारावर कारवाई करावी अशी मागणी करणार असून ते पुढे देखील नगर विकास विभागाचे मूख्य सचिव यांना देखील याबाबत पत्र देऊन कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते केतन भोज हे करणार आहेत, तसा वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा देखील करणार आहेत.

# कळंबच्या ह. भ. प. सुनीता आडसुळ महाराज यांना आदर्श माता पुरस्कार सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे, महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन यांच्या वतीने आयु. वत्सलामाई आदर्श माता पुरस्कार - २०२६ वितरण कार्यक्रम दि.५ रोजी लातूर येथे संपन्न झाला.




या कार्यक्रमात धाराशिव जिल्हा वारकरी साहित्य परिषदेच्या जिल्हाध्यक्षा ह.भ.प सुनीताताई अडसूळ महाराज यांचा वत्सलामाई आदर्श माता पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयोजक तथा माजी खासदार डॉ.सुनील गायकवाड हे होते. तर प्रा. इंदुताई बटनपुरकर यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या, महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशनचे सचिव सुफी शमशोध्दीन सय्यद लातूर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. या पुरस्काराबद्दल ह. भ. प. सौ. सुनिताताई अडसूळ महाराजांचे सर्वत्र कौतुक होत आहेत.

# वणंद येथे माता रमाई आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्थेच्या वतीने त्यागमुर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वणंद (ता. दापोली) येथे ७ फेब्रुवारी रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक जनजागृती आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून माता रमाई यांच्या स्मृतींना यावेळी उजाळा देण्यात आला.



सदर कार्यक्रमाचे नेटके नियोजन 'बार्टी'चे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा, प्रसिद्धी विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मातोश्री रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. जयंती महोत्सवाचे औचित्य साधून नागरिकांसाठी सवलतीच्या दरात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे व इतर महापुरुषांचे मौल्यवान ग्रंथ, पुस्तके अनुयायांना उपलब्ध करून देण्यात आली होती, या पुस्तक विक्री दालनाचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले या वेळी भारतीय बौद्ध महासभेचे सरचिटणीस एस. के.भंडारे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमातील मुख्य आकर्षण ठरलेल्या मी रमाई बोलते या एकपात्री प्रयोगातून प्रेरणा खरात यांनी माता रमाईंचा संघर्षमय जीवनप्रवास जिवंत केला. यावेळी अनेकांच्या डोळ्यात अश्रू वाहिले. त्यानंतर शाहीर

### बार्टीच्यावतीने विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

शाहिद खेरटकर आणि त्यांच्या संचाने क्रांतीची पाऊले या संविधान व भीमगीतांच्या कार्यक्रमातून उपस्थितांमध्ये चैतन्य निर्माण केले. यावेळी बोलताना भीमराव आंबेडकर यांनी रमाईच्या कार्यावर प्रकाश टाकला व बार्टीच्या विविध उपक्रमाचे कौतुक केले .

तसेच बार्टी आयोजित रमाई जयंती उत्सव उत्कृष्ट केल्याचे सांगितले. प्रारंभी विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी प्रास्ताविक करतांना बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्टी रमाईच्या कार्याचा गौरव करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून रमाईच्या संघर्षमय जिवनातील अनेक घटनांचे संशोधन करण्यासाठी संशोधन प्रकल्प हाती घेतल्याचे सांगितले.

या प्रसंगी भन्ते सुमेध बोधी, भंते कौडिण्य, भंते सारिपुत्र ,भंते आनंद, भंते प्रज्ञाज्योती, रत्नागिरीचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक बाबुराव महामुनी, दापोलिचे पोलीस निरीक्षक तोरसकर, सरपंच संजना दैवघरकर, पोलिस पाटील सोनाली काटे,बार्टीचे

प्रकल्प व्यवस्थापक सुमेध, थोरात, विकास गायकवाड, धिरज खाडे,उषा भिंगारे, जागृती गायकवाड, ज्योती झांजरे, माधुरी सोनवणे, राजर्षी कांबळे,रामदास लोखंडे,राहुल कवडे, प्रियदर्शनी माने, पूजा वायदंडे, माहेश्वरी विचारे, धनश्री अवसरे, सुश्मिता वाघमारे, गौरी सोनवणे, अमीर मुलानी, आकाश कु-हाडे कमलेश कुटे, अक्षय ढमाले, शंकर माने अशोक साबळे, भिसे,चेतन ढवळे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याचे, समतादूत तसेच वनंद गावातील वनंदकर भावकी मधून दीपक धोत्रे अतिष धोत्रे ,सुभाष धोत्रे,संजय धोत्रे, संतोष धोत्रे, प्रज्ञा कांबळे, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी , समता सैनिक दलाचे सैनिक,

बार्टीचे कर्मचारी अधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच राज्यभरातुन अभिवादन करण्यासाठी आलेले अनुयायी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वणंद परिसरातील नागरिकांनीही या महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# नायगाव जिल्हा परिषद गट भाजपाकडे, तर दोन्ही पंचायत समिती गण उबाठा शिवसेनेकडे !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


नायगाव: प्रतिनीधी, राजकुमार माळी कळंब तालुक्यातील नायगाव जिल्हा परिषद गटातून भाजपाचे उद्धव ऊर्फ राजाभाऊ शितोळे-पाटील यांनी ११३ मतांच्या फरकाने विजय मिळवला आहे. मात्र या गटातील नायगाव व रांजणी या दोन्ही पंचायत समिती गणांमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या सौ.सीमाताई सुरज टेकाळे, हया ५८ मतांनी विजयी झाल्या तर योगेश्वरीताई गणेश पवार ह्या २३५ मतांनी विजयी झाल्या असुन नायगाव जिल्हा परिषद गटात अतिशय अटी तटीची आणि चुरशीची लढत पाहायला मिळाली होती. भाजप ज़िल्हा परिषद गटाचे उमेदवार राजाभाऊ ऊर्फ उद्धव शितोळे-पाटील आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उमेदवार अनिल राजाभाऊ साळुंके यांच्यात ही लढत रंगली होती. दोन्ही पक्षांकडून प्रभावी, सूक्ष्म व तगडी प्रचार यंत्रणा राबविण्यात आली होती. या निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्यातील राजकीय जाणकारांचे लक्ष लागून होते. निकालात अखेर शेवटच्या क्षणी भाजप उमेदवाराच्या गळ्यात विजयाची माळ पडली असून नायगाव जिल्हा परिषद गट भाजपाने आपल्या ताब्यात घेतला आहे. मात्र या गटातील दोन्ही पंचायत समिती गण शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.नायगाव पंचायत समिती गणातून सौ. सीमाताई सुरज टेकाळे यांनी तर रांजणी पंचायत समिती गणातून सौ. योगेश्वरीताई गणेश पवार यांनी विजय मिळवला, तर दणदणीत यश संपादन केले आहे.

### ओझर महाविद्यालयात स्टँड अप जूनियर जॉनी लिव्हरची रंगली कॉमेडी

# विद्यार्थ्यांमधील कला गुणांचा विकास करण्यासाठी स्नेहसंमेलने गरजेची : क्षीररसागर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आजच्या या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी कला गुण व छंद जोपासले पाहिजे. ज्यु.जॉनी लिव्हर यांच्या आवाजाचे कौतुक करीत विद्यार्थ्यांनी असा एखादा छंद जोपासत अर्थाजनाचा मार्ग निवडावा ,तसेच विद्यार्थ्यांमधील कला,गुण व छंद विकसित करण्यासाठी अशी स्नेहसंमेलने महत्त्वाची भूमिका बजावतात असे प्रतिपादन प्रमुख अतिथी मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी या प्रसंगी केले.असुन.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी क्रमिक अभ्यासाबरोबरच विविध कला, सांस्कृतिक स्पर्धा आणि क्रीडा स्पर्धांमधून आपले व्यक्तिमत्व घडवावे. अशा उपक्रमातून आपल्या भावी जीवनाला दिशा मिळते असे प्रतिपादन म.वि.प्र.संस्थेचे उपसभापती . डी.बी मोगल यांनी ओझर महाविद्यालयात केले. महाविद्यालयाच्या वार्षिक गुणगौरव समारंभात अध्यक्षीय मनोगत व्यक्त




करताना मोगल बोलत होते. मंचावर यावेळी .माजी आमदार नानासाहेब बोरस्ते, संचालक शिवाजीराव गडाख, संचालिका श्रीमती शोभाताई बोरस्ते, भागवतबाबा बोरस्ते, प्राचार्य डॉ. डी. डी. लोखंडे, स्थानिक समिती अध्यक्ष किशोर कदम, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. नारायण पाटील, आय क्यूएससी प्रमुख डॉ. एम डी दुगजे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ सुनिता उफाडे.आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ज्युनिअर जॉनी लिव्हर उर्फ रामेश्वर यांनी विद्यार्थ्यांना नकला व मिमिक्रीच्या खास शैलीतील आवाजाने खळखळून हसवले जॉनी यांनी केलेल्या मराठी, हिंदी चित्रपट व मराठी मालिकांमधील कलाकार,विविध पशुपक्षी तसेच राजकीय नेत्यांचे हुबेहूब आवाजाने उपस्थित श्रोते थक्क झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.डी.लोखंडे यांनी प्रास्ताविकातुन कार्यक्रमाचा हेतू व उद्देश स्पष्ट केला. स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. नारायण पाटील यांनी अतिथींचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.सुनिता उफाडे यांनी करून दिला. तर कु. सपना हुजरे हिने वार्षिक अहवालाचे वाचन केले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी, गुणवंत सेवक, विविध स्पर्धांमध्ये नैपुण्य मिळवलेले विद्यार्थी, मविप्र युवा स्पंदन मधील यशस्वी कलावंत विद्यार्थी, विद्यापीठ, राज्यस्तरीय राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू विद्यार्थी यांना प्रमाणपत्र, पदक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या प्रसंगी स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य नंदकुमार कदम, कोंडाजी चौधरी, सुनील गायखे, विजय शिंदे, रवींद्र गायकवाड, भीमराव बोराडे, पानगव्हाणे सर, प्रकाश महाले,प्रा एस के आवारे, डॉ डी एस बोराडे, एक डॉ आशा कदम, प्रा संजय पवार आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ एस वाय सरदार,डॉ पूनम पाटील,डॉ यशवंत चौधरी, प्रा ए टी टर्ले,प्रा पल्लवी खांदवे, डॉ डी पी सौदागर यांनी केले. प्रा बी टी शिंदे यांनी आभार मानले, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोन्हाळी येथील चिदानंद उण्णद यांचा जातीचा दाखला वैध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी गावचे सरपंच चिदानंद सिध्दप्पा उण्णद यांचा हिंदू-कोष्टी इतर मागासवर्गीय ओबीसी प्रवर्गातील जातीचा दाखला वैध असल्याचा निकाल कोल्हापूर येथील सर्किट बेंच येथील न्यायाधीश अजित बी कडेठाणकर आणि आर जी अवचट यांच्या उच्च



### उण्णद कुटुंबियांना मोठा दिलासा; उच्च न्यायालयाच्या न्यायपालिकेने दिला निकाल

न्यायालयाच्या न्यायपालिकेने दिला आहे.चिदानंद उण्णद विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर प्रतिवादी यांच्यात चिदानंद उण्णद यांचा जातीचा दाखला अवैध असल्याचा कोर्टात वाद सुरु होता. यामुळेच चिदानंद उण्णद यांचे सरपंचपद देखील धोक्यात आले होते या न्यायालय निकाला मुळे चिदानंद उण्णद कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे. चिदानंद उण्णद यांच्या जातीचा दाखला त्यांचा मुलगा सिध्देश चिदानंद उण्णद यांच्या जारी केलेल्या वैधतेच्या प्रमाणपत्राचा आधार घेऊन दि ५ फेब्रुवारी २०२६ रोजी

हा निकाल देण्यात आला आहे. या निकालामुळे दि ११ जून २०२४ रोजीचा विवादित आदेश रद्द करण्यात आला आहे.याचिका कर्त्याकडून ॲड राकेश भाटकर ,ॲड मोहित दळवी ,ॲड आर्या अंबुलकर तर प्रतिवादी कडून तेजस जयप्रकाश कापरे यांनी काम पाहिले आहे.

# अक्कलकोट तालुक्यात भाजपचे निर्विवाद वर्चस्व

## शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर, काँग्रेसला धक्का

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी –

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये अक्कलकोट तालुक्यात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने स्पष्ट वर्चस्व मिळवले आहे. तालुक्यातील बहुतांश गट व गणांमध्ये भाजपचे उमेदवार विजयी झाले असून, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना (शिंदे गट) दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. तर काँग्रेसला तालुक्यात एकही जागा मिळाली नाही, त्यामुळे काँग्रेस पूर्णपणे हद्दपार झाल्याचे चित्र आहे.

**जिल्हा परिषद गटांचा निकाल (एकूण ६ गट)**

भाजपने ६ पैकी ४ गटांमध्ये विजय मिळवला, तर शिवसेनेने २ गट राखले. चपळगाव (६३) – शांभवी सचिन कल्याणशेट्टी (भाजप), वागदरी (६४) – प्रवीण तानवडे (शिवसेना) , जेऊर (६५) – विकास बुळगुंडा (भाजप), मंगरुळ (६६) – शिवानी महादेव स्वामी (भाजप), नागणसूर (६७) – सिद्धाराम मिलिंद शिंदमुरे (भाजप), सलगर (६८) – शिवराज सिद्धाराम म्हेत्रे (शिवसेना)

**गटनिहाय बलाबल (एकूण ६ गट) भाजपा : ४, शिवसेना : २**

**अक्कलकोट पंचायत समिती – विजयी उमेदवार (२०२६)**

चपळगाव (१२५) – सागर कल्याणशेट्टी (भाजप)

कुरनूर (१२६) – विनोद मोरे (भाजप)

वागदरी (१२७) – आप्पासाहेब किवडे (भाजप)

शिरवळ (१२८) – गणेश मोरे (शिवसेना – शिंदे गट)

दहिटणे (१२९) – आशा चंद्रकांत इंगळे (भाजप)

जेऊर (१३०) – विमल विलास गव्हाणे (भाजप)

सुळेगाव तळकवडे (१३१) – उत्तम पिरप्पा बागमारे (भाजप)

मंगरुळ (१३२) – सुमी सामर हिंडोळे (भाजप)

नागणसूर (१३३) – वैशाली विरभद्र सलगर (भाजप)

तोळणूर (१३४) – रेखा शिलंत शिवरात्र (शिवसेना – शिंदे गट)

सलगर (१३५) – पिंपळा लक्ष्मण सोलापुरे (शिवसेना – शिंदे गट)

मुगळी (१३६) – संगीता शिवानंद पाटील (शिवसेना – शिंदे गट)

**गणनिहाय बलाबल (एकूण १२ गण) भाजपा : ८, शिवसेना : ४**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा प्रभाव तालुक्यात निर्णायक ठरला, भाजपने गट व गण दोन्ही स्तरांवर आघाडी घेतली. तर माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने सलगर गटासह चार गण राखले, मात्र भाजपच्या तुलनेत मागे राहिली.

काँग्रेसला तालुक्यात खातेही उघडता आले नाही, हा पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

# पडघा आर. के. पालवी इंग्रजी शाळेचा १९ वा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव/भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघे येथील आर. के. पालवी विद्यामंदिर इंग्रजी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचा १९ वा वार्षिक स्नेहसंमेलन शनिवारी व रविवारी सायंकाळी बालाजीनगर, नगर पडघे येथील भव्य मैदानात मोठ्या उत्साहात पार पडला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व प्राचार्य रवींद्र पालवी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक व क्रीडाप्रात्यक्षिकांद्वारे उपस्थितांची मने जिंकली. स्नेहसंमेलनात भारतीय सांस्कृतिक वारसा जतन करणारी नृत्ये, तसेच प्राचीन भारतीय क्रीडा प्रकार असलेल्या मल्लखांबाचे थरारक सादरीकरण करण्यात आले. लाकडी खांबावर व दोरीवर हवेत योगासने, कसरती व कुस्तीचे डाव दाखवत विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांकडून जोरदार दाद मिळवली. यासोबतच शारीरिक क्षमता, शिस्त व स्वसंरक्षण तंत्रांचे दर्शन घडवणारी

**मल्लखांब, कराटे व समूहनृत्यांतून विद्यार्थ्यांचा सामाजिक संदेश; विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळवणाऱ्यांचा सन्मान**

कराटे कौशल्यांची प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली. मोबाईलचे दुष्परिणाम, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, भारतीय सैनिकांचे शौर्य, शेतकऱ्यांचे जीवन, पंढरीची वारी, अपघात जनजागृती आणि मैत्रीचा संदेश अशा विविध विषयांवर आधारित समूहनृत्यांतून विद्यार्थ्यांनी प्रभावी सामाजिक संदेश दिला. पहिली ते दहावी तसेच अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील कार्यक्रम सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

यावेळी संस्थेची उभारणी करताना आलेल्या अडचणी व संघर्षांविषयी संस्थापक रवींद्र पालवी यांनी मनोगत व्यक्त केले. वर्षभरात विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला, तसेच उत्कृष्ट पालक म्हणून काही पालकांनाही गौरविण्यात आले. कार्यक्रमाला शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी पालवी विद्यामंदिर इंग्रजी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# दोन शिवसेना एकत्र आलेल्या बार्शीत भाजपची जोरदार मुसंडी






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राज्यात दोन शिवसेना एकत्र आल्याने लक्षवेधी आणि चर्चेत आलेल्या बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये भाजपने व्हाईट वॉश विजय मिळवला. भाजप नेते राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वात बार्शीतील जिल्हा परिषदेच्या (नझ) ६ आणि पंचायत समितीच्या १२ जागां जिंकत महाआघाडीचा सुपडा साफ करण्यात आला. विशेष म्हणजे, राजेंद्र राऊत यांच्याकडे गेल्या २० वर्षांपासून येथील पंचायत समिती ताब्यात असून यंदा ५ व्यांदा विजय मिळवत राऊतांनी आपला विधानसभेचा पराभव पुसून टाकला. विधानसभेच्या पराभवानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती, नगरपालिका आणि आता जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांमधील राऊतांचं यश कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवणारं आहे. तर, या निवडणूक निकालामुळे पहिल्यांदाच येथील ग्रामीण भागात भाजपचे कमळ खुलले आहे.

बार्शीत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सर्वच्या सर्व जागा भाजपने ताब्यात घेत ठाकरे गटाचे विद्यमान आमदार दिलीप सोपल यांचा बार्शीत दारुण पराभव केला. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वात बार्शीतील जिल्हा परिषदच्या ६ पैकी ६ आणि पंचायत समितीच्या १२ पैकी १२ जागांवर विजय मिळवत पहिल्यांदाच बार्शी तालुक्यात झेडपी आणि पंचायत समितीवर भाजपची सत्ता स्थापन केली आहे. विशेष म्हणजे, भाजपा विरोधात दोन्ही शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित आणत दिलीप सोपल यांनी महाआघाडी स्थापन केली होती. महाआघाडीच्या निवडणूक प्रचारासाठी उपमुख्यमंत्र एकनाथ शिंदे बार्शीत आले होते, त्यांची सभाही जोरदार झाली. त्यांच्या सभेनंतर २ तासांतच त्यांनी अडीच कोटींचा निधी देखील मंजूर केला होता. मात्र, भाजप विरोधात सर्वपक्षीय आघाडी असताना देखील अक्षरशः महाआघाडीचा सुपडा साफ झालाय. राजेंद्र राऊत यांनी गावपातळीवर निर्माण केलेलं संघटन, बेरजेचं राजकारण, विकासाच्या मुद्द्यावर केलेला प्रचार आणि विधानसभा निवडणुकानंतर त्यांच्या भूमिकेत झालेला बदल येथील जनतेला भावला. तसेच, मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आलेली ताकदही त्यांच्यासाठी महत्त्वाची ठरली.

**राजेंद्र राऊतांकडून व्हाईट वॉश, सोपलांचा मोठा पराभव**

याशिवाय राजेंद्र राऊत यांचे सुपुत्र आणि भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत यांनी युवकांची बांधलेली मोट, बाजार समितीच्या चेअरमनपदी असताना गावागावात निर्माण केलेल्या संघटनात्मक बांधणीतून जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये निर्वावाद वर्चस्व मिळवण्यात राऊत गटाला आणि पर्यायाने भाजपला यश मिळालं. दरम्यान, या अभूतपूर्व विजयानंतर माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी जनतेचे आभार मानले आहेत. तसेच, जनतेचे आभार व्यक्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः बार्शीत येणार असल्याची माहिती देखील त्यांनी यावेळी दिली

# मेरा बुद्रुक येथे प्रगटदिनाच्या पावन पर्वावर ठेवलेल्या संकल्पपूर्ती सोहळ्याला उसळला जनसागर!





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे / चिखली तालुका प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील सर्वात जास्त लोकसंख्येचे गाव असलेले मेरा बुद्रुक येथे दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री.गजानन महाराजांच्या प्रगटदिनाच्या पावन पर्वावर मेरा बुद्रुक येथे ग्रामपंचायतच्या सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांनी आयोजित करण्यात आलेला संकल्पपूर्ती सोहळा अत्यंत भक्तिभावाने, उत्साहात आणि अध्यात्मिक वातावरणात पार पडला. या मंगल प्रसंगी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध किर्तनकार, आवाजाचे जादुगार ह.भ.प.श्री पुरुषोत्तम महाराज पाटील (भुतेकर) यांच्या सुमधुर वाणीतील प्रेरणादायी किर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. महाराजांच्या ओघवत्या शैलीतील प्रवचन,भावस्पर्शी अभंग, जीवनमूल्यांची शिकवण आणि समाजप्रबोधनात्मक विचारांनी उपस्थित भाविकांचे मन जिंकून घेतले. किर्तनादरम्यान त्यांनी गावकरी मंडळींशी मनमोकळा संवाद साधत, श्रद्धा,संस्कार, एकोप्याचे महत्त्व आणि सामाजिक जबाबदारी यावर मार्गदर्शन केले.त्यांच्या प्रत्येक शब्दातून भक्ती, ऊर्जा आणि सकारात्मकतेचा संदेश मिळत होता.या सोहळ्याला उपस्थित सर्व ग्रामस्थ, भाविक भक्त, मान्यवर आणि तरुण वर्ग यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली. संपूर्ण वातावरणात भक्ती, उत्साह, आनंद आणि समाधान यांचा सुरेख संगम दिसून आला.श्री.गजानन महाराजांचा जयघोष, नामस्मरण आणि कीर्तनाच्या गजरात पार पडलेला हा संकल्पपूर्ती सोहळा सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.

**महाराष्ट्रात संकल्पपूर्ती सोहळा ठेवणारी मेरा बुद्रुक एकमेव ग्रामपंचायत : ह.भ.प पुरुषोत्तम महाराज पाटील**

या संकल्प मूर्ती सोहळ्यामध्ये महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कीर्तनकार आवाजाचे जादूगार ह.भ.प श्री.पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी आपल्या कीर्तन रुपी सेवेमधून सांगितले की महाराष्ट्रातील मेरा बुद्रुक ही एकमेव अशी ग्रामपंचायत आहे की त्यांनी आपला पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर संकल्पपूर्ती सोहळ्याचे आयोजन केले, आज पर्यंत महाराष्ट्र मध्ये संकल्पपूर्ती सोहळ्याचा कार्यक्रम झाला नाही. तेरा सदस्य असलेल्या मेरा बुद्रुक ग्रामपंचायतचा कारभार गेल्या पाच वर्षापासून राष्ट्रवादीचे नेते तथा ग्रामपंचायत सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच सौ. अनितातार्ई वायाळ यांच्या कार्यकाळात व्यवस्थित चालू असून गावातील नागरिकांच्या विश्वासामुळेच अनेक कामे गावात करू शकलो, गावची सगळ्यात महत्त्वाची पिण्याच्या पाण्याची समस्या अनेक वर्षापासून होती ती पूर्णत्वास नेली, गावातील माय माऊलीच्या डोक्यावरचा हंडा आमच्या ह्या पाच वर्षाच्या कार्यकाळात कमी केला हे आम्ही करू शकलो श्री संत गजानन महाराजांच्या कृपेमुळेच तसेच अनेक विकास कामे मेरा बुद्रुक गावामध्ये करण्यात आली आहे हे सर्व ग्रामपंचायत सदस्य व मेरा बुद्रुक ग्रामस्थ यांच्या सहकार्यामुळेच ही विकास कामे करू शकलो राष्ट्रवादीचे नेते तथा ग्रामपंचायत सदस्य गजानन वायाळ यांनी संकल्प पूर्ती सोहळ्यामध्ये हजारोच्या संख्येने जमलेल्या ग्रामस्थांना संबोधित करताना ते बोलत होते, मी पुन्हा येईल असं म्हणणार नाही पण आपण येणाऱ्या काळामध्ये जर तुम्ही आम्हाला सेवेची संधी दिल्यास विकासाची गंगा ही मेरा बुद्रुक गावात आणल्याशिवाय राहणार नाही. संकल्पपूर्ती सोहळ्यानिमित्त ठेवलेल्या कीर्तनाला मेरा बुद्रुक गावासह परिसरातील अनेक गावातील हजारो नागरिकांनी या कीर्तन सेवेचा लाभ घेतला.

**मी पुन्हा येईल असे म्हणणार नाही पण भविष्यात आपण संधी दिल्यास गावात विकासाची गंगा आणेल : गजानन वायाळ**

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १५६ वी शतकोत्तर वैचारिक प्रबोधनात्मक मोफत साप्ताहिक कार्यशाळा**

**बी. बी. मेश्राम यांचे प्रतिपादन**

# रमाईच्या ठायी असणारे सद्गुण जोपासणाऱ्या महिलांनी पुढे येऊन चळवळीचे कार्य वेगाने गतिमान करावे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने रमाई जयंती प्रित्यर्थ देशाच्या हितासाठी मी माझे वैयक्तिक हित सोडून देण्यास तयार आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८६ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १५६ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेचे कार्यालय ४, साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे १ फेब्रुवारी २०२६ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ ला स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारणी सभेचे सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी पॅट्रन्सला ₹३०००, समर्थकांना ₹२०००, सहानुभूतीदारांना ₹१०००, आजीवन सदस्यांना ₹५००, सहयोगी सदस्यांना ₹२०० तर सामान्य सदस्यांना अनुक्रमे ₹२५, ₹१०, ₹५, ₹३ व ₹१ रुपया शुल्क ठरविण्यात आले होते. यावरून बाबासाहेबांच्या काळात काही विशिष्ट निष्ठावान व्यक्ती त्या काळातही श्रीमंत होत्या, त्यामुळे चळवळही त्या काळात श्रीमंत होती. याचे मर्म समाजाला कळाले असते तर आजच्या काळात सुद्धा समाजातील हितचिंतकांनी त्या प्रमाणात आपले योगदान देऊन चळवळीला श्रीमंत केले असते. परिणामी चळवळ गरीब झाली अशी म्हणण्याची वेळच आली नसती. परंतु समाज धुरीनांना बाबासाहेबांची चळवळच कळाली नाही म्हणून या चळवळीची विदारक अवस्था झालेली आहे. या परिस्थितीचे भान ठेवून आपण समाजहिताला प्राथमिकता दिली पाहिजे. जेणेकरून, त्यातून देशहित सुद्धा जपले जाईल. व्यापक प्रमाणात जनतेने रस्त्यावर उतरले पाहिजे असे म्हटले जाते परंतु रस्त्यावर उतरून जनतेने नेमकं काय करायचे? हे मात्र कुणीही स्पष्ट करायला तयार नाहीत, तर मग अशा पोरकट नेतृत्वाला समाज कसा स्वीकारणार? चळवळीत महिलांचे योगदान असावे, असे अनेकांना वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर २० जुलै १९४२ ला नागपूरच्या महिला परिषदेत म्हणाले होते की, मी समाजाची प्रगती यावरून मोजतो की, त्या समाजात महिलांच्या प्रगतीने कोणता स्तर गाठलेला आहे आहे? त्याची पूर्तता करण्यासाठी रमाईच्या ठायी असणारे सद्गुण जोपासणाऱ्या महिलांनी पुढे येऊन चळवळीचे कार्य वेगाने गतिमान केले पाहिजे. हीच त्या रमाईला खरी आदरांजली ठरेल. जेणेकरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षापूर्तीला महिलांनी आपले योगदान दिल्याचे सिद्ध होईल. याचे मर्म कळावे म्हणून आपण देशाच्या हितासाठी मी माझे वैयक्तिक हित सोडून देण्यास तयार आहे. याप्रसंगीक विषयावर चर्चा करीत आहोत.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना डॉ. राजमिलिंद पुदाले म्हणाले की, शिकलेल्या वर्गासह लाभार्थ्यांनी सामाजिक दायित्व ओळखून चळवळीचे कार्य पार पाडले पाहिजे. नेते मंडळीची नैतिक पातळी घसरत चालल्याने वैयक्तिक स्वार्थासाठी शत्रू पक्षाची सुद्धा हात मिळवनी करतात, ज्यामुळे चळवळ वाढताना दिसत नाही. बेरोजगारी कमी करण्यासाठी आपण उद्योजक तयार केले पाहिजेत. आर्थिक वाटा शोधल्या पाहिजेत. यूजीसी क्ट आणण्यात सरकारचे दुटप्पी धोरण असल्याचे जाणवते. न्यायपालिका राजकारण्यांची बटिक झाली असल्यामुळे एस. सी. चे उपवर्गीकरण व क्रिमिलेअरचा मुद्दा पुढे केला जातो.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना ड. अविनाश थिटे म्हणाले की, ज्यांना आपण आपले समजतो तीच माणसे आपल्या विरोधात कृती करीत असल्याचे समाज जीवनात पाहायला मिळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चिरंजीव राजरत्न यांच्या मृत्यू नंतर गुंडाळण्यासाठी साधा कपडा सुद्धा न मिळणे म्हणजे आपण कुठल्या गरीबीत होतो? याची स्पष्ट जानीव होते. अपघातातून बचावल्यानंतर अजून काही काळ उर्वरित कार्य पूर्ण करण्यासाठी जगावेच लागेल अशी अपेक्षा बाबासाहेबांनी व्यक्त केली होती.

याप्रसंगी राहुल मेश्राम म्हणाले की, महापुरुष शतकातून एखादे जन्माला येतात. जे केवळ देशहिताला प्राधान्य देतात. अशोक मेश्राम म्हणाले की, त्यागमूर्ती रमाईच्या सद्गुणांना समाज जीवनात प्रचारित आणि प्रसारित केले पाहिजे. जेणेकरून समाजाला ते अंगीकारता येईल. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, कराडला जात असताना झालेल्या अपघातातून बाबासाहेब बचावले होते, म्हणून त्या प्रसंगी हा समारंभ आयोजित करण्यात आला होता, त्याप्रसंगी बाबासाहेबांनी सदरील विधान केले आहे. संसदेत आपले १३१ खासदार असले तरी ते आपली भूमिका नीट पार पाडत नसल्याने आपणाला त्यांचा काही लाभ होत नाही.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक ड. विलास रामटेके तर उद्योजक मिलिंद बागुल यांनी आभार व्यक्त केले. अशाप्रकारे हर्षोल्हासात साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.